क्रमांक : १८५६१ /मविस/क-२ (संगणक)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२६

::परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन विधानभवन, नागपूर येथे होणार असून अधिवेशनाकरीता आवश्यक असणारी संगणकीय सामुग्री नागपूर येथून उपलब्ध होणार आहे. मात्र अधिवेशनाकरीता लागणारा महत्वाचा डेटा कॉपी करुन नागपूर येथे घेऊन जावयाचे असून याकरीता सर्व कक्षांनी त्यांचा data संगणक कक्षामार्फत संगणक नियंत्रण कक्षातील संगणकावर कॉपी करणे आवश्यक आहे. संगणक नियंत्रण कक्षातील संगणकावर **डेटा कॉपी करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील :-**

१) महत्वाचा डेटा नागपूर येथे नेण्याकरीता संगणक कक्षाकडून संगणक उपलब्ध करून देण्यात येईल.
२) डेटा कॉपी करण्याची अंतिम मुदत या सचिवालयाचे कामकाज मुंबई येथे गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२६ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत राहील. त्यानंतर जर कक्षांमार्फत डेटा कॉपी करावयाचा राहून गेला तर तो डेटा नागपूर येथे आणण्याची व्यवस्था संबंधित कक्षांना स्वतः करावी लागेल.
३) या प्रक्रीयेमध्ये फक्त अधिवेशनाकरीता लागणारा महत्वाच्या डेटा करावयाचा असून या डेटा व्यतिरिक्त अन्य कोणताही डेटा उदा. गाणी, गेम्स, फोटो इ. कॉपी करु नयेत, तसे आढळून आल्यास संबंधित कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात येईल व संबंधितांवर योग्य ती कायवाही करण्यात येईल.
४) डेटा कॉपी करण्यासाठी या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर NGP_DATA_BACKUP या नावे बॉक्स उपलब्ध असून सदरहू बॉक्सवर प्रत्येक कक्षाने क्लिक करून त्यांच्या कक्षाच्या नावे login करावे. (उदा. C२) आणि password करिता संगणक कक्षाशी संपर्क साधावा.
५) डेटा व्यवस्थितरित्या कॉपी करण्याची जबाबदारी संबंधित कक्षाचे कक्ष अधिकारी आणि कक्षात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची राहील.
६) प्रतिवेदन कक्षाबाबत ही जबाबदारी प्रत्येक प्रतिवेदकाची असेल.
७) अधिकाऱ्यांच्या वापरातील संगणकाबाबत ही जबाबदारी स्वतः त्यांची आणि त्यांच्या स्विय सहाय्यकाची राहील.
८) मा. पीठासीन / उप पीठासीन अधिकारी यांचे संदर्भात यांच्या कार्यालयाचा डेटाबाबत ही जबाबदारी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची राहील.
९) सर्व कक्षांनी त्यांचा डेटा व्यवस्थित कॉपी करुन घेतला आहे किंवा कसे याची खात्री संबंधित कक्षाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी करुन घेणे आवश्यक राहील.
१०) उपरोक्त दर्शविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन सर्व संबंधित कक्षांनी संगणक कक्षास सहकार्य करणे आवश्यक राहील.
११) डेटा कॉपी करण्यास आवश्यकता असल्यास संगणक कक्ष सहाय्य करेल.
१२) वरील डेटा कॉपी करण्याची कार्यवाही अधिवेशन संपल्यावर नागपूरहून मुंबई येथे येते वेळीही अवलंबिण्यात येईल.

Digitally signed by MOHAN SADASHIV KAKAD
Date: 2026.11.04 13:40:13 +05'30'

(मोहन काकड)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :-

१) मा. पीठासीन अधिकारी /मा. उप पीठासीन अधिकारी यांची कार्यालये.
२) सचिव १ , सचिव २, सचिव ३ आणि सचिव ४ यांची कार्यालये.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.